राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि.वि/३३७७

दिनांकः— ११.०७.२०२२.

**सत्र २०२२—२३ करीता पदवी स्तरावरील अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील प्रवेशासाठी नोंदणी करण्याकरिता मुदतवाढ देण्याबाबत.**

## जाहिर सुचना

सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व प्राचार्यांना या सुचनेद्वारे सुचित करण्यांत येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या प्रवेशाकरिता दि.२७—६—२०२२ पर्यंत विद्यापीठाच्या https://rtmnuoa.digitaluniversity.ac/ या पोर्टलवर नोंदणी करावयाची होती. व महाविद्यालयांना नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्राधान्य सुची प्रकाशित करुन दि. ११—७—२०२२ पर्यंत प्रवेश देण्याबाबत व दि. १५—७—२०२२ पर्यंत प्रतिक्षा यादीतून प्रवेश देण्याबाबत विद्यापीठाद्वारे प्रवेशासाठी एकरुप वेळापत्रक निश्चित करुन दिले आहे. सदर वेळापत्रकानुसार महाविद्यालयाद्वारे प्रवेशाची प्रक्रिया करण्यात येत आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी अद्यापही विद्यापीठाच्या उपरोक्त पोर्टलवर नोंदणी केलेली नाही. यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याकरीता विद्यापीठाद्वारे प्रवेशासाठी नोंदणी करण्याकरिता उपरोक्त पोर्टल दि. ११—७—२०२२ पासून विद्यापीठाद्वारे ठरविण्यात येणा—या प्रवेशाच्या अंतीम तारखेपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे.

करिता सर्व संबंधितांनी याची नोंद घेवून विहीत मुदतीत नोंदणीची प्रक्रिया, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन प्रवेश निश्चितीबाबतची कार्यवाही विहीत मुदतीत करण्यात यावी.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव
महाविद्यालय विकास विभाग